**3.3.2 Number of awards and recognitions received for extension activities from government / government recognized bodies during the year.**

| Name of the activity | Name of the Award/recognition | Name of the awarding government/government recognised bodies | Year of award |
|---|---|---|---|
| Book Publication | State Level Best Book Award – Matoshree Vimalabai Deshmukh | Shabdh Srushti Akola | 2021-2022 |
| Book Publication | State Level Best Book Award – Adhyakshiy Bhashane | Late. Motoshree Suryakanta Devi Pote State Level Award | 2021-2022 |
| International Women Day | Nari tujhe Salam Award | Nanak Aahuja Trust Amravati | 2021-2022 |

**Award No 01.**
**State Level Best Book Award –Matoshree Vimalabai Deshmukh**



# शब्दसृष्टी साहित्यरत्न पुरस्कारामध्ये राज्यातील साहित्यिकांच्या कलाकृतींचा समावेश







**अकोला:** युवा पिढीला नवी दिशा नवी जाण देणाऱ्या साहित्यकृतींना अकोल्याच्या सृष्टी बहुउद्देशीय संस्थेतर्फे दरवर्षी शब्दसृष्टी साहित्य रत्न पुरस्काराने गौरविण्यात येते. यंदा शिवाजी महाविद्यालयात १७ ऑक्टोबरला आयोजित पाचव्या राज्यस्तरीय युवा मराठी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होत आहे.

कोल्हापूर येथील राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक, राज्य पुरस्कार प्राप्त साहित्यिक डॉ. श्रीकांत पाटील यांच्या 'लॉकडाऊन' कादंबरीला यंदाचा शब्दसृष्टी साहित्य पुरस्कार घोषित झाला आहे. गोव्याचे बाल साहित्यिक रमेश वंसकर यांच्या 'शाळा सुटली पाटी फुटली' या बालकविता संग्रहास, शिवाजी शिंदे यांच्या 'कँवार' या काव्यसंग्रहास तर मुंबई येथील डॉ. स्मिता निखिल दातार यांना 'डी. के. दातार द वायोलिन सिंगस' या साहित्यकृती-साठी पुरस्कार जाहीर केला आहे.
गणेश भाकरे यांच्या 'विठूमाऊली की विठोबा', दिनेश गावंडे यांच्या 'कंदिलाच्या लख्ख उजेडात' या काव्यसंग्रहास, सप्तर्षी माळी यांच्या 'फिंद्री' कथा संग्रहास, रामदास राजेगावकर यांच्या 'पक्षी आणि प्राणी गाती त्यांची गाणी' या बाल कविता संग्रहास, रसूलदा पठाण यांच्या 'निसर्गाशी जुळवून नाते' या बालकविता संग्रहास, डॉ. मंदा नांदुरकर यांनी लिहिलेल्या 'मातोश्री विमलाबाई देशमुख' या पुस्तकास पुरस्कार जाहीर झाला आहे. डॉ. र. पा. खोडके यांचे मूळ मराठीतील व तुळशिराम बोबडे यांनी अनुवादित केलेले 'सुभेदार तानाजी मालुसरे' यासाठी व्यक्तिचित्रण पुरस्कार तर पं. केशव गुंडो इंगळे यांचे मूळ मराठीतील पुस्तकाचे प्रा. डॉ. कौमुदी क्षिरसागर बर्डे यांनी हिंदीत अनुवादीत केलेल्या 'गायनाचार्य पं. बालकृष्णबुवा इचलकरंजीकर की भारतीय संगीत को देन' या पुस्तकास सुद्धा शब्दसृष्टी साहित्यरत्न पुरस्काराने गौरविण्यात येणार असल्याचे संमेलनाचे आयोजक संतोष इंगळे यांनी कळविले.

**Award No. 02**

**State Level Best Book Award – Sanman Pratibhecha**

